

सर्व श्रेष्ठ दान विद्या दान

**समाज शिक्षण मंडळ संचलित**

# आमृतेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विंझर

**ता. वेल्हा, जि.पुणे ४१२२१३**

**आय.डी.क्र.पीयु/पीएन/एसी१२१/(१९९७)**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न**

**स्थापना वर्ष १९९७**

**NAAC ‘B’ पूनर्मूल्यांकन**

## माहिती पुस्तिका

**२०२०-२०२१**

# विविध उपक्रमाचे आयोजन



फडके, बोरगे, डोंगरे व कदम परिवार शिष्यवृती वितरीत करताना मा.कार्याध्यक्ष प्रदीप शिवराम फडके

पालक मेळाव्या निमित्त उपस्थित मा.प्राचार्य व मान्यवर.







आयुका येथे अभ्यास सहली दरम्यान महाविद्यालयाचे विद्यार्थी

विज्ञान सहलीत सहभागी प्राध्यापक व महाविद्यालयातील विद्यार्थी



# विविध उपक्रमाचे आयोजन



राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत पिंपरी येथे श्रमदान करते वेळेस महाविद्यालयाचे विद्यार्थी



पदवीप्रधान समारंभा समयी मा.कार्याध्यक्ष प्रदीप शिवराम फडके, मान्यवर व पदवी प्राप्त महाविद्यालयाचे विद्यार्थी




डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यामाले समयी मार्गदर्शन करताना



फिट इंडिया मोमेंट समयी महाविद्यालयाचे विद्यार्थी


# समाज शिक्षण मंडळ, विंझर विद्यमान संचालक मंडळ



मा.श्री.ॲड. सदानंद (नंदूकाका) गोविंद फडके
(मानद अध्यक्ष)



मा.श्री.दत्तात्रय बबन पडवळ
(अध्यक्ष)



मा.श्री.प्रदिप शिवराम फडके
(कार्याध्यक्ष)



मा.श्री.संतोष बबन दसवडकर
(उपाध्यक्ष)



मा.श्री.अशोक दगडू भुरूक
(सचिव)



मा.श्री.संतोष साधूभाऊ लिम्हण
(कोषाध्यक्ष)



मा.श्री.भगवानराव काशिनाथ लिम्हण
(संचालक)



मा.श्री.यशवंत बळीबा गायकवाड
(संचालक)



मा.श्री.नंदकुमार पंढरीनाथ सागर
(संचालक)



मा.श्री.संभाजी गोपाळ भोसले
(संचालक)



मा.श्री.ॲड. हनुमंत दत्तात्रय शिंदे
(संचालक)



मा.श्री.विलास मारूती किरवे
(संचालक)

# मा. कार्याध्यक्षांचे मनोगत

विद्यार्थी मित्रहो, समाज शिक्षण मंडळ संचलीत अमृतेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची ओळख करुन देताना व मनोगत मांडताना मला आनंद होत आहे. पूर्वीपासुन पुणे हे विद्येचे माहेर घर आहे. या विद्येच्या माहेर घरापासुन अवघ्या ५५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या वेल्हा तालुक्यात मात्र विज्ञान युगाची पहाट होताना आधुनिक भारताचा उदय होत असताना येथील विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहू नये म्हणून शिक्षण दानाच्या उदात्त प्रेरणेने ग्रामस्थांनी व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी तालुक्यातील एकमेव वरिष्ठ महाविद्यालय उभारले. लागोपाठ कनिष्ठ महाविद्यालय उभारले. संस्थेसाठी व महाविद्यालयासाठी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू आहे व त्याचा संर्वागीन विकास व्हावा व त्याच्यात राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ व्हावी हा मुख्य उद्देश आहे. 'सर्व श्रेष्ठ दान विद्या दान' हे ब्रिदवाक्य उराशी बाळगून महाविद्यालयात उच्चप्रतीचे शिक्षण मिळावेम्हणुन महाविद्यालयात व्यासंगी प्राध्यापक, सुसज्ज प्रयोगशाळा, संगणक संस्थेनी उपलब्ध करून दिले आहेत. वेळोवेळी नवनवीन व उत्तमोत्तम पुस्तकांची भर घालत महाविद्यालयाचे ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व पुढे रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून महाविद्यालयात विविध विभाग कार्यरत आहेत.

सशक्त शरीरात सशक्त मन रहाते हा लोकमान्य टिळकांचा सुविचार मनाशी बाळगुन संस्थेनी महाविद्यालयात सुसज्ज जिमखाना व प्रशस्त क्रिडांगण उपलब्ध करुन दिले आहे.

महाविद्यालयाचा विद्यार्थी आदर्श नागरिक बनेल. आपल्यातील उत्कृष्ट सद्‌गुणांनी राष्ट्राची निस्वार्थ भावनेने सेवा करेल अशी या महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून अपेक्षा आहे.

मा. प्रदिप शिवराम फडके
कार्याध्यक्ष
समाज शिक्षण मंडळ, विंझर

## प्राचार्यांचे मनोगत



मित्रहो, महाविद्यालयाचे माहितीपत्रक आपल्या समोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने भावी पिढी सुजाण व सुसंस्कृत बनविण्यासाठी अगदी खेड्यातील सामान्य कुटुंबातील पाल्यानेही शिकले पाहिजे हे जाणून १९६१ साली समाज शिक्षण मंडळ विंझर या संस्थेची स्थापना झाली. पुणे शहर हे जरी विद्येचे माहेरघर असले तरीही पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील शिक्षणाची अवस्था अत्यंत बिकट होती. साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी होते, म्हणूनच ''सर्वश्रेष्ठ दान विद्यादान'' हे ब्रीदवाक्य घेऊन समाज शिक्षण मंडळ विंझर या संस्थेने आपल्या शैक्षणिक कार्याचा श्री गणेशा केला.

१५ ऑगस्ट १९९७ रोजी अमृतेश्वर कला महाविद्यालय वेल्हे तालुक्यातील एकमेव वरिष्ठ महाविद्यालय म्हणून स्थापन झाले. या महाविद्यालयाची इमारत या गावातील सर्व ग्रामस्थांच्या श्रमदानातून झाली. सन २०१० मध्ये वाणिज्य विद्याशाखा १०० टक्के अनुदानित तत्वावर सुरू झाली. तसेच २०१३ पासुन विज्ञान विद्याशाखा १०० टक्के अनुदानीत तत्वावर सुरू झाली व जून २०१४ मध्ये ज्युनिअर विज्ञान कनिष्ट महाविद्यालय सुरू झाले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत असणाऱ्या योजना यशस्वीपणे राबविल्या जातात. गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत कमवा व शिका योजना राबविली जाते. सदर योजनेत दरवर्षी जवळपास पन्नास विद्यार्थी सहभागी होऊन उत्स्फुर्तपणे श्रमदान करतात. त्यातून विद्यार्थी आपले शैक्षणिक साहित्य खरेदी करून श्रमप्रतिष्ठा जपतात. विद्यार्थीनींच्या व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयात विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना राबविली जाते. मुलींना कायदेविषयक, आरोग्यविषयक, तसेच महिलांचे हक्क व अधिकारांची जाणीव, लघुउद्योगांची माहिती, महिला सबलीकरण, विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास या विषयी कार्यशाळा घेण्यात येतात.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या दृष्टीने बहिःशाल शिक्षण केंद्रांतर्गत विविध व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात येते. तसेच वृक्षारोपण, कन्यारत्न अभियान या सारख्या विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबनाचे धडे देण्याच्या हेतूने दरवर्षी श्रमसंस्कार शिबिरांचे आयोजन केले जाते. या शिबिरात विद्यार्थी ग्रामस्वच्छता, हागणदारीमुक्त, गाव पर्यावरण जाणिव जागृती, वृक्षलागवड अशा अनेक उपक्रमांतून श्रमदान करतात.

महाविद्यालयास आता २२ वर्ष पूर्ण झाली आहेत. वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी संस्था व महाविद्यालय कटीबध्द आहे. विद्यार्थ्यांना वर्षभर मिळणारे मार्गदर्शन व सहकार्यामुळे महाविद्यालय परिसरात मन मोकळे वाता वरण निर्मण होण्यास मदत होते.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होण्यास मदत होईल व वैज्ञानिक दृष्टिकोण प्राप्त झालेला विद्यार्थी आदर्श व सुजान नागरिक बनून समाजाचे व देशाचे सर्व पातळीवर नेतृत्व करेल याची मी ग्वाही देतो.

**प्राचार्य डॉ. संजीव लाटे**

## ❋ महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये ❋

तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग
समृध्द ग्रंथालय
प्रशस्त इमारत व निसर्गरम्य परिसर
भव्य क्रिडांगण व देशी - विदेशी खेळांची सोय
स्पर्धा परिक्षेची तयारी
नामवंत तज्ज्ञांची व्याख्याने
सुसज्ज संगणक प्रयोगशाळा व इंटरनेट सुविधा
व्यवसाय समुपदेशन व रोजगार मार्गदर्शन विभाग
विविध शिष्यवृत्या

विद्यार्थी कल्याण मंडळ
सुसज्ज प्रयोगशाळा
उत्कृष्ट निकालाची परंपरा
राष्ट्रीय सेवा योजना
विद्यार्थ्यांना व्यक्तिगत मार्गदर्शन
बहि:शाल शिक्षण व्याख्यानमाला केंद्र
सुसज्ज व्यायामशाळा
'कमवा-शिका' योजना
विद्यार्थी विकासाच्या अनेक समित्या

## 'समाज शिक्षण मंडळ', विंझर या संस्थेचा परिचय

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने भावी पिढी सुजाण व सुसंस्कृत बनविण्यासाठी अगदी खेड्यातील सामान्य कुटुंबातील पाल्यानेही शिकले पाहिजे, हे जाणून १९६१ साली समाज शिक्षण मंडळ, विंझर या संस्थेची स्थापना झाली. पुणे शहर हे जरी विद्येचे माहेरघर असले तरीही पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील शिक्षणाची अवस्था अत्यंत बिकट होती. साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी होते म्हणूनच ''सर्वश्रेष्ठ दान विद्यादान'' हे ब्रीदवाक्य घेऊन समाज शिक्षण मंडळ विंझर या संस्थेने आपल्या शैक्षणिक कार्याचा श्री गणेशा केला.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पद स्पर्शाने पावन झालेल्या राजगड-तोरणा किल्ल्यांच्या कुशीत विराजमान झालेल्या वेल्हे तालुक्यात शैक्षणिक, सामाजिक कार्यासाठी स्थापन झालेली संस्था म्हणजे ''समाज शिक्षण मंडळ.'' विंझर गावामध्ये माध्यमिक शाळा असावी म्हणून सर्व गावकरी श्रीयुत बापूजी साळुंखे यांना भेटले. यास प्रतिसाद म्हणून विंझर गावचे ग्रामस्थ श्री. गणेश दामोदर पटवर्धन यांनी शाळेसाठी एक एकर जागा देणगी म्हणून दिली व त्या जागेवर ग्रामस्थांनी श्रमदानाने इमारत बांधली. त्या अगोदर हायस्कूलचे वर्ग अमृतेश्वराच्या मंदिरात, भैरवनाथाच्या देवळात व गावातील पडक्या भिंतीच्या घरात भरत होते.

केंद्र सरकारने महाराष्ट्रात १६ तालुके अतिमागास म्हणून जाहिर केले आहेत. त्यामध्ये वेल्हे तालुक्याचा समावेश आहे. हा तालुका दुर्गम व डोंगरी असल्याने पायाभूत सोयी-सुविधा लोकांना उपलब्ध झालेल्या नाहीत. अशा या सर्वच दृष्टीने मागास असलेल्या तालुक्यात संस्थेने आपल्या ध्येय व उद्देशानुसार सन १९९७ साली अमृतेश्वर कला महाविद्यालय ग्रामस्थांनी कर्तव्य भावनेने सुरू केले. सन २०१०-२०११ साली वाणिज्य विद्या शाखा १००% अनुदान तत्वावर सुरू झाली आणि सन २०१३-२०१४ साली विज्ञान विद्या शाखा १००% अनुदान तत्वावर सुरू झाली. ही एक आनंदाची बाब आहे. महाविद्यालयास सन २०१० साली यु.जी.सी दिल्ली कडून कायम स्वरूपी संलग्नीकरण प्राप्त झाले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यते नुसार महाविद्यालयाचे ''अमृतेश्वर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय'' असे नामकरण केले आहे. महाविद्यालयाचे प्रथम 'नॅक' मुल्यांकन (राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्विकृती परिषद, बंगळुरू) सन २००३-२००४ मध्ये झाले व त्यामध्ये महाविद्यालयास 'सी+' ही श्रेणी देण्यात आली. सन २०१५-२०१६ मध्ये नॅक (राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्विकृती परिषद, बंगळुरू) पुनर्मुल्यांकन समितीने महाविद्यालयास भेट देऊन पाहणी केली. त्यामध्ये महाविद्यालयास 'बी' ही श्रेणी देण्यात आली.

संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वेतनेतर अनुदान मिळत नाही. तरीही ''समाज शिक्षण मंडळ'' संस्था स्वखर्चाने विविध उपक्रम राबवित आहे. संस्थेने सन २००५-२००६ मध्ये सात एकर जमीन खरेदी केली. या जागेवर महाविद्यालयासाठी आवश्यक असणारी इमारत बांधायचे नियोजन आहे.

उच्चशिक्षणा बरोबरच संस्थेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व गुणवत्तावाढीकडे कडे जाणीवपूर्वक लक्ष दिलेले आहे. प्राध्यापकांना त्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी संस्थेने मुक्तहस्तपणे परवानगी दिली आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू डोळ्यांसमोर ठेऊन शैक्षणिक ज्ञानदानाचे कार्य संस्थेमार्फत अविरतपणे सुरू आहे.

# महाविद्यालय विकास समिती

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री. प्रदिप शिवराम फडके | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. अशोक दगडू भुरूक | संस्था नामनिर्देशीक सदस्य |
| ३ | मा.श्री. प्रा. सुरेश शंकर मुळूक | प्राचार्य नामनिर्देशीत विभाग प्रमुख |
| ४ | मा.श्री. प्रा. विजय बापू कदम | समन्वयक आय.क्यू.ए.सी. |
| ५ | मा.श्री. प्रा. डॉ. रितेश वांगवाड | अध्यापक सदस्य १ |
| ६ | मा.श्री. प्रा. डॉ. राहुल दत्ता कांबळे | अध्यापक सदस्य २ |
| ७ | मा.श्री. प्रा. ज्योती तुषार भाटे | अध्यापक सदस्य ३ महिला |
| ८ | मा.श्री. विजय मारूती लिम्हण | अध्यापकेत्तर सदस्य |
| ९ | मा.श्री. प्राचार्य नंदकुमार पंढरीनाथ सागर | शिक्षण क्षेत्रातील सदस्य |
| १० | मा.श्री. उमेश मारोती गायकवाड | संशोधन क्षेत्रातील सदस्य |
| ११ | मा.श्री. मंदार विश्वास फडके | उद्योग क्षेत्रातील सदस्य |
| १२ | मा.श्री. प्रकाश लक्ष्मण पिसे | सामाजिक क्षेत्रातील सदस्य |
| १३ | मा. श्री. प्राचार्य डॉ. संजीव संपतराव लाटे | प्राचार्य व सचिव |

## * रॅगिंग प्रतिबंधक समिती *

| | |
|---|---|
| १. अध्यक्ष | प्राचार्य डॉ. संजीव लाटे |
| २. सचिव प्रशासन प्रतिनिधी | प्रा. मोकाशी आर. एम. |
| ३. सदस्य (कला) | प्रा. नामदास ए. के. |
| ४. सदस्य (वाणिज्य) | प्रा. डॉ. श्रीखंडे वाय. एन. |
| ५. सदस्य | प्रा. डॉ.शेंडकर एस.एल. |

## * महिला तक्रार निवारण समिती * (विशाखा समिती)

| | |
|---|---|
| १. अध्यक्ष | प्राचार्य डॉ. संजीव लाटे |
| २. सचिव | प्रा. डॉ. शेंडकर एस. एल. |
| ३. सदस्य | प्रा. डॉ. बागुल सीमा अशोक |
| ४. सदस्य | प्रा. भाटे ज्योती तुषार |

# * विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना *

**(अ) प्रवेशासंबंधी :**

विद्यार्थ्यांनी महाविद्यालय प्रवेश घेताना तसेच प्रवेश घेतल्यानंतर खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

१) या माहितीपुस्तिके सोबत जोडलेला प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांने स्वतःच्या सुवाच्च हस्ताक्षरात संपूर्ण व बिनचूक भरावा.

२) अर्जासोबत शाळा/ महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र(L.C./T.C.) जोडावे.

३) विद्यालय/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र(L.C/T.C.) जोडलेले नसल्यास तात्पुरता प्रवेश(Prvisional Admission) दिला जाईल. (L.C/T.C.) आणून देण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.

४) प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्यास १२ वी पास झालेल्या परिक्षेचे मार्कलिस्ट व त्याच्या दोन सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात. त्या प्रती साक्षांकित(True copy)केलेल्या असाव्यात. (मार्कलिस्टच्या अगोदरच पुरेशा झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात.)

५) महाविद्यालयीन कामकाजाबाबात विद्यार्थ्यांनी व पालकांनी कार्यालयात प्रथम मुख्य लिपीक श्री. व्ही. एम. लिम्हण यांना भेटावे. त्यानंतर आवश्यकता भासल्यास संबंधितांनी परवानगी घेऊनच मा. प्राचार्यांना भेटावे.

६) महाविद्यालयाने निर्धारित केलेल्या वेळेतच विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेल.

७) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ई.बी.सी., बी.सी. आणि पी.टी.सी. इ. शैक्षणिक सवलतीचे अर्ज विशिष्ट मुदतीत कार्यालयामध्ये सादर करावेत. अर्ज सादर केल्यानंतर संबंधित सेवकाकडून त्याची पोहोचपावतीघ्यावी. पोहोच पावती जपून ठेवणे आवश्यक राहील. फी सवलतीबाबत नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

८) प्रवेश पावत्या विद्यार्थ्याने हरविल्यास डुप्लिकेट पावत्या पुन्हा मिळणार नाही.

९) प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्यांनी बारावीची मूळ गुणपत्रिका सुमारे एक वर्षानंतर परत मिळेल. यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०) प्रवेश अर्जावर बरेच विद्यार्थी आपला घरचा पत्ता पूर्ण व व्यवस्थित लिहित नाहीत. अशावेळी अपूर्ण पत्त्यामुळे विद्यार्थ्यास, पालकास पाठविलेली पत्रे परत येतात. अशी पत्रे न मिळाल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकेल त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

११) विद्यार्थ्याने वेळोवेळी दिलेल्या पावत्या, प्रमाणपत्रे, गुणपत्रिका इ. कागदपत्रे यांची गरज भासते. यासाठी अशी सर्व कागदपत्रे एका स्वतंत्र फाईलमध्ये जपून ठेवावीत.

१२) प्रत्येकवर्षी प्रवेश देताना विद्यार्थ्यांच्या गतवर्षीच्या वर्तवणुकीचा विचार केला जाईल.

१३) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जावर व ओळखपत्र कार्डवर फोटो चिकटवून द्यावा व विद्यार्थ्यांनी परीक्षा ॲडमिट कार्डवर व रजिस्टरवर चिटकविण्यासाठी दिलेल्या मागील बाजूस पूर्ण नाव, वर्ग व रोल नंबर लिहून द्यावेत.

१४) प्रवेश रद्द करणेची प्रक्रिया शासन व विद्यापीठाच्या नियमानूसार राबविण्यात येईल.

**(ब) परीक्षेसंबंधी :**

ट्युटोरियल्स, प्रथम सत्र परिक्षा, युनिट टेस्ट, प्रात्याक्षिक पुस्तिका इ. तसेच शारीरिक शिक्षणाच्या व पर्यावरण जाणीव जागृती परीक्षांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**(क) शिस्तीसंबंधी :**

१) महाविद्यालयीन शिस्तीचे पालन करणे सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

२) महाविद्यालयात खाजगी सहली आयोजित केल्या जाणार नाहीत. या बाबी मान्य असलेल्यांनीच या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा. या अटीवर प्रवेश घेतल्यानंतर यापैकी कोणतीही मागणी केल्यास किंवा आग्रह धरल्यास आपोआप प्रवेश रद्द होईल.

३) महाविद्यालयात, वर्गात अगर परिसरात पान, तंबाखू खाणे अथवा धुम्रपान करणे यास सक्त मनाई आहे. असे करताना तसेच तंबाखू व तत्सम पदार्थ खाऊन थुंकताना आढळल्यास कडक शासन केले जाईल.

४) प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवक/कर्मचारी यांचेशी हुज्जत घालणाऱ्या, गैरवर्तन करणाऱ्यावर कडक शासन केल जाईल. व त्याच्या महाविद्यालयातील प्रवेश रद्द केला जाईल. या प्रसंगी पोलीस कारवाई केली जाईल.

५) ग्रंथालयामधील पुस्तके फाडणे, पुस्तकातील पाने फाडून घेणे इत्यादी बाबत पुस्तकांच्या किंमतीच्या तिप्पट रक्कम दंडापोटी वसूल केली जाईल.

६) विद्यार्थ्याने महाविद्यालय, महाविद्यालयाचा परिसर व एस.टी. बस स्थानक इ. ठिकाणी शिस्त, सभ्यता, शांतता राखावी.

७) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वास्तूचे, मालमत्तेचे, फर्निचरचे नुकसान केल्यास त्यांचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द केला जाईल. तसेच पोलीस कारवाई केली जाईल व संपुर्ण नुकसान भरपाई घेतली जाईल.

८) सर्व समारंभाप्रसंगी शिस्त, शांतता राखणे, त्यासंबंधीच्या नियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. महाविद्यालयातील विविध उपक्रम शांततेत यशस्वी करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर आहे. बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यास कडक शासन केले जाईल. प्रसंगी प्रवेश रद्द केला जाईल.

९) महाविद्यालयाच्या परिसरातील फुलझाडे व परिसर स्वच्छ ठेवणे आणि त्यांचे संरक्षण करणे ही सर्व विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील.

१०) वर्ग चालू असताना एखाद्या वर्गात जाऊन अगर वर्गाजवळ जाऊन व्हरांड्यात गोंधळ करणाऱ्या विद्यार्थ्यांना कडक शासन केले जाईल. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

**(ड) सर्वसाधारण सूचना :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्याक आहे.

२) महाविद्यालयाचा परिसर व वर्ग स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी विद्यार्थ्याने योग्य ती काळजी घ्यावी.

३) प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सायकल (दुचाकी) स्टँड व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपली वाहने स्वतःच्या जबाबदारीवर लावावीत.

४) बैठक व्यवस्था व बेंच रचना यामध्ये बदल करू नये. बैठक व्यवस्था व महाविद्यालयीन वेळ इत्यादी प्रशासकीय बाबतीत मा. प्राचार्यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.

५) महाविद्यालयाचे सेवक नियमितपणे वर्ग स्वच्छ करतील. परंतु वर्ग अस्वच्छ होणारच नाही याची विद्यार्थ्यांनी व विद्यार्थीनींनी काळजी घ्यावी.

६) वर्ग प्रतिनिधीने अध्यापन, कामकाज अभ्यासेत्तर उपक्रम वर्ग व्यवस्थापन, स्वच्छता याबाबत योग्य तो सहभाग घेऊन संबंधित विभागप्रमुखांना अहवाल सादर केल्यास त्यानुसार विविध उपक्रमांचे नियोजन व बदल करणे शक्य होईल.

७) महाविद्यालयासंबंधीचे कोणतेही वृत्त प्राचार्यांच्या परवानगीशिवाय वृत्तपत्रात देऊ नये.

८) काही महत्वाच्या कामानिमित्त भेटू इच्छिणाऱ्या नातेवाईकांनी प्रथम कार्यालयात यावे. आपल्या पाल्यास सरळ वर्गात जाऊन भेटू नये.

९) कॉलेजच्या आवारात अनधिकृत व्यक्तीला प्रवेश करण्यास मनाई आहे.

१०) विद्यार्थ्यांना महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये १५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. कदम व्हि. बी आणि प्रा. सौ. बागुल एस. ए. यांच्याशी संपर्क साधावा. अनियमित विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच आदेशांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे राष्ट्रीय सेवा योजनेमधून कमी केली जातील.

११) विद्यार्थ्यांनी खेळ व शारीरिक शिक्षण इ. साठी शारिरीक शिक्षण संचालक प्रा.शेंडकर एल. एल. यांच्याशी संपर्क साधावा.

१२) ग्रंथालयाबाबत अडचणींच्या संदर्भात ग्रंथपाल प्रा. मोकाशी आर. एम. यांच्याशी संपर्क साधावा.

१३) विद्यार्थ्यांनी आपल्या पालकास देखील वरील नियमांची महिति करून द्यावी.

१४) नियमात बदल करण्याचे आवश्यकतेनुसार नवीन नियम तयार करण्याचे सर्व अधिकार मा. प्राचार्यांना आहेत व ते सर्व नियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहेत.

१५) महाविद्यालयीन शिस्त व नियमांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठ कायदा, राज्य शासन तसेच महाविद्यालयाच्या नियमावलीनुसार कारवाई करण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**(इ) रॅगिंगबाबत सूचना :**

सुप्रिम कोर्टाच्या दि. ११/०२/२००९ च्या आदेशानुसार आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रक क्र. १७० संदर्भ क्र. एस.डब्ल्यू/१४२९/०९ दि. २१.५.२००९ नुसार महाविद्यालयात रॅगींगच्या घटना घडल्यास संबंधित विद्यार्थ्यावर अत्यंत कडक कारवाई करण्यात येईल. रॅगिंग घटनेबाबत चौकशी केल्यानंतर विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ज्या विद्यार्थी विद्यार्थीनींना महाविद्यालयातील वसतिगृहात तसेच महाविद्यालय बाहेरील परिसरात इतर विद्यार्थी किंवा व्यक्तींकडून त्रास होत असेल त्यांनी खालील रॅगिंग समितीकडे त्वरित संपर्क साधावा. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याकडे लेखी तक्रार करावी.

# अभ्यासक्रम

**✻ कला शाखा विषय ✻** (ARTS FACULTY)

**✻ प्रथम वर्ष कला** (F.Y.B.A.) (Chose Based Credit System Pattern 2019)

| | | |
|---|---|---|
| १. अनिवार्य इंग्रजी | २. अर्थशास्त्र | ३. राज्यशास्त्र |
| ४. इतिहास | ५. भूगोल | ६. मराठी |

**✻ द्वितीय वर्ष कला** (S.Y.B.A.) (Chose Based Credit System Pattern 2019)

१. अनिवार्य इंग्रजी

२. स्पेशल विषय (खालीलपैकी कोणताही एक विषय स्पेशलसाठी निवडणे. निवडलेल्या स्पेशल विषयाचे दोन पेपर असतात.)

✻ इतिहास (स्पेशल पेपर क्र.१ व २) ✻ राज्यशास्त्र (स्पेशल पेपर क्र. १ व २)

३. जनरल (सामान्य) विषय (जनरल/सामान्य विषय म्हणून तीन विषय निवडणे. त्यामध्ये जो विषय स्पेशलसाठी निवडलेला आहे तो जनरलसाठी निवडणे अनिवार्य असते. उरलेल्यामधून दोन विषय सामान्य स्तरासाठी निवडावे लागतात.)

✻ अर्थशास्त्र ✻ राज्यशास्त्र

✻ भूगोल ✻ इतिहास

**४. पर्यावरण जाणीव जागृती (अनिवार्य विषय)**

**✻ तृतीय वर्ष कला** (T.Y.B.A.)

१. अनिवार्य इंग्रजी

२. स्पेशल विषय (द्वितीय वर्ष कला वर्गात निवडलेल्या स्पेशल दोन पेपर तृतीय वर्षामध्ये असतात, त्यात बदल करता येत नाही.)

✻ इतिहास (स्पेश पेपर क्र. ३ व ४) ✻ राज्यशास्त्र (स्पेशल पेपर क्र. ३ व ४)

३. जनरल विषय (सामान्य) द्वितीय वर्ष कला वर्गात निवडलेले तीन जनरल (जनरल/सामान्य) विषय तृतीय वर्षासाठी अनिवार्य असतात.

✻ अर्थशास्त्र ✻ राज्यशास्त्र ✻ इतिहास ✻ भूगोल

✻ वाणिज्य शाखा विषय (COMMERCE FACULTY)

✻ प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com ) (Chose Based Credit System Pattern 2019)

1. Functional English
2. Financial Accounting
3. Business Economics (Micro)
4. Mathematics & Statistics

**5. Optional Group - 1 (Any One)**

I) Banking & Finance
II) Commercial Geography

**6. Optional Group 2 ( Any One)**

I) Marketing & Salesmanship
II) Essential of E-Commerce

**7. Language**

I) Marathi

✻ द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com) (Chose Based Credit System Pattern 2019)

1. Corporate Accounting
2. Business Communication
3. Principle & Functions of Management
4. Elements of Company Law
5. Business Economics (Macro)

**6. Special Paper-1 (Any One)**

I) Cost & Works Accounting (Paper-1st)
II) Marketing Management (Paper- 1st)
III) Banking & Finance (Paper-1st)

7.Environmental Awareness

✻ तृतीय वर्ष वाणिज्य (T.Y.B.Com)

1. Business Regulatory Framework
2. Advanced Accounting
3. Indian & Global Economics Development
4. Auditing & Taxation

**Special Paper- 2nd & 3rd (Any One)**

I) Cost & Work Accounting ( Paper-2) & (Paper-3)
II) Marketing Management ( Paper-2) & (Paper-3)
III) Banking & Finance ( Paper-2) & ( Paper- 3)

## * विज्ञान शाखा वरिष्ठ विभाग विषय (SENIOR SCIENCE FACULTY )

*** प्रथम वर्ष विज्ञान (F.Y.B.Sc.)** (Chose Based Credit System Pattern 2019)

Group A : Physics, Chemistry, Mathematics, Botany
Group B : Physics, Chemistry, Microbiology, Botany

*** द्वितीय वर्ष विज्ञान (S.Y.B.Sc.)** (Chose Based Credit System Pattern 2019)

Group A : Physics Chemistry, Mathematics, Marathi / English
Group B : Botany, Chemistry, Microbiology, Marathi / English

*** तृतीय वर्ष विज्ञान (T.Y.B.Sc.)**

A Student shall offer any one of the three Subject offered at S.Y.B.Sc. as Principle Subject

1) Physics
2) Chemistry
3) Mathematics
4) Botany
5) Microbiology

****

## विज्ञान शाखा कनिष्ठ विभाग विषय (JUNIOR SCIENCE FACULTY)

**प्रथम वर्ष विज्ञान** (F.Y.J.C) (11 th Science )

Physics, Chemistry, Mathematics, Biology, English, Marathi .

**द्वितीय वर्ष विज्ञान** (S.Y.J.C. ) ( 12 th Science)

Physics, Chemistry, Biology, Mathematics, English,Marathi.

# अमृतेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विंझर

## * प्राध्यापक वृंद *

**प्राचार्य** : प्रा. डॉ. संजीव लाटे (M.A. M.Phil, J.D.C&A, Ph.D.)(आदर्श शिक्षक पुरस्कार)

**इंदिरा गांधी राष्ट्रीय पुरस्कार –केंद्र सरकार,**
**आदर्श शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र शासन**
**आदर्श कार्यक्रम अधिकारी पुरस्कार पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासन**

### कला विभाग

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. केंदळे बाळासाहेब मारूती | (B.Sc. M.A. History, M.A.Economics, L.L.B. SET. Ph.D) |
| २. | प्रा. डॉ. मुळूक सुरेश शंकर | (M.A. Political Science, B.Ed. M.Phil, Ph.D.) |
| ३. | प्रा. डॉ. डोंगरे महादेव दत्तू | (M.A. Economics SET, Ph.D) |
| ४. | प्रा. नामदास अंकुश किसन | (M.A. History Ph.D Appear) |
| ५. | प्रा. डॉ. बागुल सीमा अशोक | (M.A. English M.Phil, Ph.D.) |
| ६. | प्रा. डॉ. गडकर परमेश्वर संभाजी | (M.A. Economics, B.Ed. M.Phil, NET, Ph.D.) |
| ७. | प्रा. डॉ. वांगवाड रितेश व्यंकटेश | (M.A. Geography, NET, Ph.D.) |
| ८. | प्रा. डॉ. घोडके दत्तात्रय निवृत्तीराव | (M.A. Economics, M.Phil, NET, Ph.D.) |

### वाणिज्य विभाग

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ.श्रीखंडे योगेश नरहरी | (M.Com Administration M.A. Economics GDCA, SET, Ph.D) |
| २. | प्रा. कदम विजय बापु | (M.Com Adv.Accounting and Taxation, B.Ed. M.Phil, NET.) |
| ३. | प्रा. डॉ. गडकर परमेश्वर संभाजी | (M.A. Economics, B.Ed. M.Phil, NET, Ph.D.) |
| ४. | प्रा. डॉ. डोंगरे महादेव दत्तू | (M.A. Economics SET, M.Phil, Ph.D) |
| ५. | प्रा. डॉ. बागुल सीमा अशोक | (M.A. English M.Phil, Ph.D.) |
| ६. | प्रा. गावडे अनुजा विक्रम | (M.Com, SET, Ph.D. Appear) |

### विज्ञान विभाग

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. टापरे मनोजकुमार आर. | (M.Sc. Chemistry, SET, NET, Ph.D Appear) |
| २. | प्रा. माने सुजितकुमार तात्यासो | (M.Sc Physics, NET, GATE, Ph.D Appear) |
| ३. | प्रा. डॉ. शेळके दीपक भास्कर | (M.Sc Botony, SET, NET Ph.D) |
| ४. | प्रा. भाटे ज्योती तुषार | (M.Sc Mathematics, NET, Ph.D Appear) |
| ५. | प्रा. चिकटे प्रकाश भिमराव | (M.Sc Physics, NET, Ph.D Appear) |
| ६. | प्रा. डॉ. कांबळे राहुल दत्ता | (M.Sc Chemistry, SET, NET Ph.D.) (Petant Filed, Young Scientist Award) |
| ७. | प्रा. कोमल बळीराम अधवडे | (M.Sc. Microbiology) |
| ८. | प्रा. ओमकार सतीश वांढरे | (M.Sc. Chemistry SET) |

## ✻ विज्ञान विभाग कनिष्ठ महाविद्यालय ✻

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. किरण रघुनाथ जाधव | (M.A. Marathi, NET) |
| २. | प्रा. डॉ.महादेव रामकिसन चांभारे | (M.Sc. Botany PHD) |
| ४. | प्रा. रामदास नारायण शिंदे | (M.Tech. Mathematics) |
| ५. | प्रा. अक्षय महादेव मुळे | (M.Sc Botany) |
| ६. | प्रा. प्रियंका पंढरीनाथ गर्जे | (M.Sc. Chemistry) |
| ७. | प्रा. उषा रमेश कामठे | (M.Sc. Physics) |
| ८. | प्रा. राहुल शांताराम पानसरे | (M.A. English B.Ed) |

## ✻ ग्रंथपाल

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. मोकाशी रामचंद्र मनोहर | (M.A. Economics, M.Lib, I.Sc. M.Phil) |

## ✻ शा. शि. सं.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ.शेंडकर शितल लक्ष्मण | (M.Com, M.P.Ed, SET, Ph.D) |

## ✻ कार्यालयीन कर्मचारी ✻

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लिम्हण विजय मारुती | (मुख्य लिपीक) | (B.Com) |
| २. | गायकवाड विलास काळुराम | (वरिष्ठ लिपीक) | (B.Com) |
| ३. | पवार संदीप वसंत | (सेवक) | (12th Arts) |
| ४. | लिम्हण सदाशिव महादेव | (सेवक) | (10th ) |
| ५. | भोसले समीर सोपान | (सेवक) | (S.Y.B.A) |
| ६. | चव्हाण मोहन बापू | (सेवक) | (12th Science) |

**❊ ओळखपत्र** (IDENTY CARD)

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने(IDENTY CARD) घातलेच पाहिजे. महाविद्यालयाच्या परिसरात प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या प्रांगणात ओळखपत्राशिवाय विद्यार्थी आढळल्यास त्या विद्यार्थ्यास नियमबाह्य वर्तनाच्या कारवाईस सामोरे जावे लागेल. ओळखपत्राशिवाय ग्रंथालय व जिमखाना यांचा लाभ घेता येणार नाही.

ओळखपत्र हरविल्यास त्यासाठी लेखी अर्ज करून नियमानुसार शुल्क पुन्हा भरावे लागेल. ओळखपत्र घेताना तीन पासपोर्ट साईज रंगीत फोटो ग्रंथालयात द्यावे लागतील. वर्गपालकांच्या सुचनेनुसार ओळखपत्राबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**❊ विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम :**

खालील दर्शविलेले सर्व नियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

१) प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या सर्व विषयांच्या तासिकांना नियमित वेळेवर हजर राहिले पाहिजे. सर्व तासिकांना हजर असेल तरच त्या दिवसाची उपस्थिती ग्राह्य धरली जाईल.

२) विद्यार्थ्याने प्रत्येक विषयाचे स्वाध्याय वेळेत पूर्ण करून संबंधित प्राध्यापकांना दिले पाहिजे.

३) प्रथम सत्र परीक्षेला उपस्थित राहून प्रत्येक विषयात किमान शेकडा ४० गुण मिळविले पाहिजे. जर सदर परिक्षेत विद्यार्थी नापास झाला तर त्याचा फॉर्म पाठविणे किंवा न पाठविणे हे सर्वस्वी मा. प्राचार्यांच्या अधिकारात राहील.

४) प्रत्येक सत्रात ७५% पेक्षा कमी दिवस उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांची टर्म विद्यापीठाच्या नियमानुसार मंजूर होणार नाही व त्यास वार्षिक परीक्षेला बसता येणार नाही.

५) महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावल्या जातील. प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज सुचना फलक वाचणे आवश्यक राहील. सूचना वाचली नाही ही सबब चालणार नाही.

६) वर्ग चालू असताना कोणत्याही विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या आवारात रेंगाळू नये. आपल्या वागण्याने चालू असलेल्या वर्गाला कोणत्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही याची व्यक्तीशः व सामुदायिक खबरदारी घ्यावी.

७) प्राचार्य व प्राध्यापक यांनी महाविद्यालयाचे कामकाज व शिस्त यासंबंधी दिलेल्या लेखी व तोंडी सूचना विद्यार्थ्याने पाळल्या पाहिजेत.

८) प्राध्यापकांशी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांशी बोलताना, वागताना किंवा प्रश्न अगर शंका विचारताना विद्यार्थ्याने नम्रतेने व सौजन्यशीलतेने वागावे. महाविद्यालयातील सेवकांच्या वर्तनाविषयी विद्यार्थ्यांची काही तक्रार अगर सूचना असेल तर ती त्वरीत मा. प्राचार्यांना लेखी स्वरूपात सादर केल्यास योग्य ती कार्यवाही त्वरीत केली जाईल.

९) एखाद्या विद्यार्थ्याचे वर्तन या शिक्षण संस्थेच्या हिताच्या दृष्टीने अयोग्य किंवा अपायकारक आहे असे प्राचार्यांचे मत झाल्यास अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

१०) कॉलेज इमारतीच्या भिंतीवर, दरवाज्यावर, खिडक्यांवर ओरखडे काढणे किंवा लिहिणे, फर्निचरची मोडतोड किंवा कोणत्याही प्रकारची मोडतोड अथवा नुकसान करणे इत्यादी

## समाज शिक्षण मंडळ मार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्या

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.फडके परिवार शिष्यवृत्ती | हि शिष्यवृत्ती मा. प्रदिप शिवराम फडके यांच्या मातोश्री कै. सिंधु शिवराम फडके व त्याचे पिताश्री कै.शिवराम हरी फडके यांच्या स्मृतीपित्यर्थ दर वर्षी महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाते. याचे,यांचे स्वरूप रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह असे आहे. | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. |
| २. | न्या. बोरगे परिवार शिष्यवृत्ती | हि शिष्यवृत्ती मा. न्या.माधव जानू बोरगे यांच्या मातोश्री कै. द्रोपदीबाई बोरगे व परीवार यांच्या स्मृतीपित्यर्थ महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाते. याचे स्वरुप दिली जाते, यांचे स्वरूप रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह असे आहे. | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. |
| ३. | डॉ. डोंगरे परिवार शिष्यवृत्ती | हि शिष्यवृत्ती मा.प्रा.डॉ.महादेव दत्तू डोंगरे यांच्या मातोश्री कै.द्रोपतीबाई दत्तू डोंगरे व त्यांचे पिताश्री कै. दत्तू मानाजी डोंगरे यांच्या स्मृतीपित्यर्थ महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाते. यांचे स्वरूप रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह असे आहे. | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. |
| ४. | प्रा.कदम परिवार शिष्यवृत्ती | हि शिष्यवृत्ती मा.प्रा.विजय बापु कदम तर्फे कै. महादेव परशुराम कदम, श्री. बापुसाहेब महादेव कदम, सौ.चंद्रभागा बापू कदम आणि कै.राधाबाई परशुराम सोनवणे यांच्या नावे महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना कदम परिवारातर्फे शिष्यवृती दिली जाते. यांचे स्वरूप रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह असे आहे. | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. |

## शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्या

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील गरीब, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अर्थ सहाय्य | अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. अर्जदार इतर कोणतेही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा. विद्यार्थ्यांना कुटूंबातील सर्व कमावत्या सदस्यांचे (आई वडील व इतर) वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा जास्त नसावे. मागील परिक्षेत कमीत कमी ६०% गुण असावे | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज www.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ६. | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर अभ्यासासाठी प्रवेश घेतलेल्या फक्त विद्यार्थिनींसाठी आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थीनीला इतर कोणत्याही शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येणार नाही. मागील परीक्षेत कमीत कमी ५०% गुण असावे. मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रू. ७५,०००/- पर्यंत असावे. | www.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ७. | उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन शिष्यवृत्या | या योजनेमध्ये विविध वर्गातील व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जवळपास ४० प्रकारच्या शिष्यवृत्या उपलब्ध आहेत. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही विविध शिष्यवृत्या उपलब्ध आहेत पूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असुन नियोजित वेळेत विद्यार्थ्यांनी स्वतः काळजी पूर्वक अर्ज करावे. या योजने अंतर्गत राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती ही खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना दिली जाते. तसेच SC, ST, NT, VJ, OBC आणि SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व नादारी मिळते.तसेच आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळते. दिव्यांग विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत मिळते. मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, शिख व बौध्द समाजाच्या विद्यार्थ्यांना अल्पसंख्याक शिष्यवृत्ती मिळते. | सदरील शिष्यवृत्यांची माहिती महाराष्ट्राच्या उच्चशिक्षण विभागा-च्या संकेतस्थलावर उपलब्ध आहे. http://mahadbtmahait. gov.in |

## थोडक्यात पण महत्वाचे

१. एका वेळी एकाच शिष्यवृत्तीची रक्कम स्विकारता येईल. किंवा एका वेळी एकच फी सवलत घेता येईल. एकावेळी शासनाकडून म्हणजे विद्यापीठ किंवा शिक्षण संचालक इथवा शिक्षण सहसंचालक अगर विशेष समाजकल्याण सदरीलपैकी एकाच ठिकाणावरून आलेली एकच रक्कम स्विकारता येईल. याबाबत कोणतीही तक्रार लक्षात घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२. सवलती घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यापासून म्हणजेच बँकेत प्रवेशाची रक्कम भरल्यापासून १५ दिवसांचे आत फी सवलतीचा अर्ज योग्य त्या विहीत कागदपत्रांसह सादर केला नाही, तर त्या विद्यार्थ्यास पूर्ण फी भरावी लागेल याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार लक्षात घेतली जाणार नाही व यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

३. आपला कायमचा राहण्याचा पत्ता, सध्याचा राहण्याचा पत्ता, स्वतःचा फोन नंबर, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी संपर्कासाठी द्यावा. अगर आपला पत्ता किंवा मोबाईल नंबर, ई-मेल आयडी महाविद्यालयामध्ये शिकत असताना बदलला तर तो संबंधित विभागात देणे अनिवार्य आहे. (उदा. शिष्यवृत्ती विभाग, कचेरी)

४. जर विद्यार्थ्याने एखाद्या फी सवलतीचा अर्ज केला व शासनाने त्यातील सवलत कमी दराने मंजूर केली अथवा फी सवलत नाकारली तर संबंधित विद्यार्थ्यास उर्वरित फी त्वरित भरावी लागेल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

## महाविद्यालयात कार्यरत असणारे विविध विभाग आणि त्यांचे विभाग प्रमुख

| | | |
|---|---|---|
| अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | - | प्रा.विजय बापू कदम |
| क्रिडा विभाग | - | प्रा.डॉ. शितल शेंडकर |
| राष्ट्रीय सेवा योजना विभाग नियमित कार्यक्रम | - | प्रा. डॉ. परमेश्वर गडकर,<br>प्रा. अनुजा गावडे |
| विद्यार्थी विकास मंडळ | - | प्रा. डॉ. योगेश श्रीखंडे |
| परीक्षा विभाग | - | प्रा. डॉ. बाळासाहेब केंदळे |
| ग्रंथालय विभाग | - | प्रा. रामचंद्र मोकाशी |
| शैक्षणिक व संशोधन विभाग | - | प्रा. डॉ. राहुल कांबळे |
| बोरगे, फडके,डोंगरे व कदम पविार पारितोषिक व शिष्यवृत्ती योजना विभाग | - | प्रा. मनोज टापरे |
| यु.जी.सी. अनुदान समिती | - | प्रा. डॉ. महादेव डोंगरे |
| सांस्कृतिक विभाग | - | प्रा. किरण जाधव |
| अमृतेश्वर विज्ञान प्रदर्शन | - | प्रा.डॉ. राहुल कांबळे |
| वेळापत्रक समिती | - | प्रा. डॉ. महादेव डोंगरे |
| शैक्षणिक सहल विभाग | - | प्रा. डॉ. दिपक शेळके |
| पर्यावरण जाणिव जागृती कक्ष | - | प्रा. डॉ. दिपक शेळके |
| स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र | - | प्रा.डॉ. रितेश वांगवाड |
| आरोग्य विभाग | - | प्रा. डॉ. शितल शेंडकर |
| आजीवन अध्ययन व विस्तार विभाग | - | प्रा. डॉ. सुरेश मुळूक |
| बहिःशाल विभाग | - | प्रा. सुजितकुमार माने |

**वार्षिक परिक्षेसंबंधी माहिती :**

१. एफ. वाय ते टी. वाय बी . ए, बी . कॉम आणि एफ . वाय . बी . एस . सी. या वर्षाची वर्षाअखेर प्रत्येक विषयाची एकूण ८० गुणाची परिक्षा राहील. तर एस. वाय . बी. एस.सी. ची प्रत्येक सत्र्याच्या शेवटी ४० गुणांची परिक्षा राहील.

२. स्वाधयाची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्यास वार्षिक परिक्षेस बसता येणार नाही.

३. शासकीय व विद्यापीठीय आदेशानुसार प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयातील उपस्थीती ७५% असल्याशिवाय त्यास वार्षिक परिक्षेस बसता येणार नाही. उपस्थितीच्या अटीचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची नोंद घ्यावी.

४. वार्षिक परिक्षेस विद्यार्थ्याचे ओळखपत्र, परिक्षा प्रवेशपत्र असणे बंधनकारक आहे.

५. वार्षिक परिक्षेमध्ये कोणतेही गैरवर्तन,कॉपी इ.केले तर विद्यापीठाच्या नियमानुसार त्या विद्यार्थ्यावर कारवाई होईल.

**वैद्यकीय तपासणी :-**

प्रथम वर्ष बी.ए., बी. कॉम. व बी. एस. सी वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थीनींनी विशिष्ठ मुदतीत विद्यापीठाच्या ठराविक नमुन्यात ( पात्रता फॉर्म ) कार्यालयात भरुन देणे बंधनकारक राहील. अन्यथा परिक्षेस बसता येणार नाही व प्रवेश आपोआप रद्द समजण्यात येईल. प्रवेशाच्या वेळी भरलेल्या फी व्यतिरिक्त प्रत्येक विद्यार्थ्याला नियमानुसार लागु होणारी अन्य खर्चाची रक्कम भरावी लागेल.

**प्रवेश रद्द करण्याबाबतचे नियम :-**

विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यानंतर कोणत्याही सबबीवर फी परत मिळणार नाही. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर पहिल्या सत्रात प्रवेश रद्द करायचे असेल तर सदर विद्यार्थ्यास प्रथम सत्राची पूर्ण फी भरावी लागेल. तसेच दुसऱ्या सत्रात रद्द करायचे असेल तर द्वितीय सत्र सुरु होणेपूर्वी मा.प्राचार्याकडे छापील नमुन्यात अर्ज करावा. अन्यथा सदर विद्याार्थ्यास सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल.

महाविद्यालयातील संगणक प्रयोगशाळा



महाविद्यालयाचे ग्रंथालय



# महाविद्यालयाचे मागील शैक्षणिक वर्षातील गुणवंत विद्यार्थी

| अ.क्र. | नाव | वर्ग | टक्केवारी | गुणानुक्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | शेंडकर अंकिता तुळशीदास | ११ वी विज्ञान | ७८.०० | प्रथम |
| ०२. | रेणूसे सारिका दत्तात्रय | १२ वी विज्ञान | ६९.५३ | प्रथम |
| ०३. | खुटवड गौरव बाजीराव | प्रथम वर्ष कला | ७१.१६ | प्रथम |
| ०४. | कचरे स्नेहा तानाजी | द्वितीय वर्ष कला | ६८.६६ | प्रथम |
| ०५. | चोरगे दुर्गा रामदास | तृतीय वर्ष कला | ७६.८३ | प्रथम |
| ०६. | पिलाणे आरती रोहिदास | प्रथम वर्ष वाणिज्य | ८१.०० | प्रथम |
| ०७. | शेंडकर तेजस्विनी तुळशिदास | द्वितीय वर्ष वाणिज्य | ७७.०० | प्रथम |
| ०८. | रेणुसे सुषमा अनाजी | तृतीय वर्ष वाणिज्य | ७२.०० | प्रथम |
| ०९. | लिम्हण वैष्णवी विजय | प्रथम वर्ष विज्ञान | ८६.६६ | प्रथम |
| १०. | नांगडे दत्ता श्रीकांत | द्वितीय वर्ष विज्ञान | ८४.०४ | प्रथम |
| ११. | कांटे अनुजा चांगदेव | तृतीय वर्ष विज्ञान | ८८.०० | प्रथम |





# विविध उपक्रमाचे आयोजन




आजीवन अध्ययन व विस्तार कार्यक्रम तर्फे
राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा करताना
मा.प्राचार्य व प्राध्यापकवृंद




आजीवन अध्ययन व विस्तार कार्यक्रम तर्फे
स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करताना




वैंद्यकिय तपासणी शिबीर अंतर्गत
महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना
मार्गदर्शन करताना

# विविध उपक्रमाचे आयोजन



वार्षिक क्रिडा स्पर्धेच्या आयोजना निमित्त उपस्थित मान्यवर व महाविद्यालयाचे विद्यार्थी



पारंपारीक वेषभूषा कार्यक्रम निमित्त उपस्थित प्राध्यापकवृंद व महाविद्यालयाचे विद्यार्थी



क्रिडा स्पर्धेच्या अयोजना निमित्त उपस्थित मान्यवर व महाविद्यालयाचे विद्यार्थी



खाद्यदिवस साजरा करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



रसायनशास्त्र प्रयोगशाळा



सुक्ष्मजीवशास्त्राची प्रयोगशाळा




**महाविद्यालयाची इमारत**



**महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद**